# जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय, औरंगाबाद,

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत फाजलपुरा औरंगाबाद

दुरध्वनी क्र. 0240-2331211/ Fax No. 0240-2338394, email id - expcellhq@gmail.com


जा.क्र.जिकअ/नि.खर्च नि कक्ष/2019/ 157 दिनांक :- 16/04/2019

## नोटीस

प्रति,

श्री.खान एजाज अहेमद ,

घर नं. 3-3-17, मलीक अंबर कॉलनी,
रहेमनिया कॉलनी , औरंगाबाद

विषय :- 19-औरंगाबाद लोकसभा सर्वसाधारण निवडणूक 2019
मा. निवडणूक खर्च निरीक्षकामार्फत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचा दैनंदिन खर्च लेखा तपासणी बाबत.

संदर्भ :- 1. निवडणूक खर्चाचे नियंत्रण करण्यासाठीचे सारसंग्रह माहे फेब्रुवारी 2019
2. Conduct of Election Rule 1961 मधील नियम 87
3. या कार्यालयाचे पत्र क्र.146 दिनांक 09.04.2019 ( तपासणी वेळापत्रक)

वरील संदर्भीय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारांनी लोकप्रतिनिधी अधिनियम 1951 चे कलम 77 नुसार निवडणूकीतील प्रत्येक उमेदवारास नामनिर्देशन दाखल केल्याच्या दिनांकापासून ते निवडणूकीचा निकाल जाहीर झाल्याचा दिनांक हे दोन्ही दिवस धरुन होणाऱ्या कालावधीच्या दरम्यान निवडणूकीच्या संबंधात उमेदवास किंवा उमेदवाराच्या प्रतिनिधीला सर्व खर्चाचा स्वतंत्र व यथातथ्य हिशोब ठेवणे आवश्यक आहे. तसेच निवडणूक खर्चाचे नियंत्रण करण्यासाठीचे सारसंग्रह माहे फेब्रुवारी 2019 व Conduct of Election Rule 1961 मधील नियम 87 नुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी मतदान होई पर्यंतच्या कालावधी पर्यंत दैनंदिन खर्चाचा लेखा तीन वेळा मा.निवडणूक खर्च निरीक्षकाकडून तपासणी करुन घेणे आवश्यक आहे. तथापि दिनांक 16.04.2019 रोजी करण्यात आलेल्या द्वितीय तपासणीमध्ये दिनांक 11/04/2019 ते 15/04/2019 या कालावधीचे आपणाकडील खर्चाचे लेखे तपासले आसता खालील अनियमितता (त्रुटी) आढळून आल्या.

1. आपण नामांकन पत्र दि.29.3.2019 रोजी दाखल केले, तथापि त्यापूर्वी एक दिवस निवडणूक खर्च साठी स्वतंत्र बँक खाते उघडणे आवश्यक असतांना आपण ते उशिराने नामांकनानंतर दि. 30.3.2019 रोजी उघडले आहे.
2. आपण नामांकन पत्र भरतांना हाती शिल्लक असलेली रक्कम रु.50000/- सदर बँकेत खात्यात न भरता सदर शिल्लक रक्कमेतुनच खर्च केला असल्याचे आढळून आले व त्यानंतर शिल्लक रक्कम रु.24,800/- बँक खात्यात भरणा केली आहे.
3. सर्व व्यवहार सदर बँक खात्यामार्फत घेणे आवशक असतांना तसे न केल्यामुळे अनियमितता घडली आहे.

Scanned by CamScanner

सदर बाब ही Conduct of Election Rule 1961 मधील नियम 87 चा भंग करणारी आहे. तेव्हा या नोटीसीव्दारे आपणास सूचित करण्यात येते की, या सदंर्भात आपला खुलासा ही नोटीस प्राप्त झाले पासून 48 तासाच्या आत या कार्यालयाकडे सादर करावा अन्यथा आपणा विरुध्द भा.द.वि 1860 चे कलम 171 (I) नुसार मा.सक्षम न्यायालयात तक्रार दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल या बाबत गांर्भियाने नोंद घ्यावी.

**निवडणूक निर्णय अधिकारी**
**19-लोकसभा मतदार संघ औरंगाबाद** करिता

प्रत

1. जिल्हा माहिती अधिकारी यांना देवून कळविण्यात येते की, सदरील नोटीसीची व्यापक प्रसिध्दी स्थानिक वर्तमान पत्रात देण्यात यावी.
2. जिल्हा समन्वयक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC) औरंगाबाद यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
3. सुचनाफलक.

Scanned by CamScanner